# विदर्भाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

**नारायण त्र्यं. महाजन** संशोधक विद्यार्थी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

**प्रस्तावना:** विदर्भाला इ.स. पूर्व ४००० वर्षाचा प्राचीन इतिहास लाभलेला आहे. इतिहासाच्या तीनही टप्प्यात विदर्भाचे अस्तित्व पहावयास मिळते. प्रागैतिहासिक काळापासून ते स्वतंत्र्यपूर्व काळापर्यंत विदर्भावर विविध घरण्यांची सत्ता प्रस्थापित होती. मौर्य, सातवाहन, वाकाटक, कलाचुरी, राष्ट्रकुट, कल्याणीचे चालूक्य, देवगिरीचे यादव, मुस्लीम राजवटी, गोड राजांचे राज्य, मराठा राज्य इ. घराण्यांची सत्ता विदर्भात होती. त्यामुळेच विदर्भाला इतिहासाचा वारसा लाभाला आहे. शिलालेख, ताम्रपट, नाणे, प्रतिमा, वस्तु किल्ले, इत्यादीच्या आधारावर कोणत्या घराण्याची सत्ता विदर्भात होती हे विविध इतिहासकारांनी शोधण्याचा प्रयत्न केला. रामायण, महाभारत वैदिक काळात सुद्धा विदर्भाचा उल्लेख आढळतो. विदर्भाच्या साहित्याला सुद्धा एक मोठी परंपरा आहे. कालीदासांसारखे विद्वान कवी विदर्भात निर्माण होते. त्यांच्या रचित करण्यातून विदर्भाचा प्रचिनतेचा उल्लेख दिसून येतो

**पौराणिक काळातील विदर्भ** :पौराणिक काळात विदर्भाचा उल्लेख दिसून येतो. रामायण, महाभारत उपनिषदे यामध्ये विदर्भाचा उल्लेख आहे. विदर्भाची स्थापना यदु वंशातील विदर्भ नावाच्या राजाने केली त्यामुळे या प्रदेशाला ‘विदर्भ’ असे नाव पडले.[१] विदर्भाच्या नावात विविध आख्यायिका प्रसिद्ध आहे आणि लिखित साहित्याच्या आधारावर विदर्भाचे अस्तित्व दिसून येते. ऋग्वेदात असलेल्या उल्लेखातुन लोपामुद्रा हि विदर्भ कन्या होती. व अगस्त ऋषी आणि लोपामुद्रा याचा संवाद महाभारतात (वनपर्व) आहे.[२] जगप्रसिद्ध भारतविदयातज्ञ डॉ. म.म नानासाहेब उपाख्य वा.वि. मिराशी म्हणतात, विदर्भ देशाचे नाव ऋग्वेदात येत नाही, पण ‘वैदर्भिकौंडिण्य’ या ऋषीचा उल्लेख बृहदारण्यक उपनिषदात (उत्तर वैदिक वाङ्मय) येतो.[३] यावरून लक्षात येते की विदर्भ हा उपनिषद काळात अस्तित्वात होता. इतिहासातील अभ्यासकांमध्ये विदर्भाच्या नावावर किंवा त्यांच्या कार्यकालावरून मतभेद दिसतात. पण पुराव्याच्या आधारे विदर्भाचे अस्तित्व होते हे मात्र दिसून येते. रूक्मीणीचा उल्लेख वैदर्भी म्हणून करण्यात येते. रूक्मीणीचे हरण कुंडीनपूरातून केले होते याचा पुरावा इतिहासात पौराणिक साहित्यात मिळतो. रूक्मीणी ही भिष्मक राजाची कन्या होती. विदर्भात भिष्मक राजाचे राज्य होते. कौडिण्यपूर हि विदर्भाची राजधानी होती. यावरून हे स्पष्ट होते की, विदर्भ प्रदेश पौराणिक काळात अस्तित्वात होता याचा उल्लेख दमयंती हि सुद्धा विदर्भ कन्या होती. तिचा विवाह निषद देशाचा राजा नल यांच्याशी झाला हे प्रसिद्ध आहे. जैमिणी उपनिषदात सुद्धा विदर्भाचा उल्लेख आढळतो. बालरामायणात राजशेखर यांनी विदर्भाचा उल्लेख ‘सरस्वतीजन्मभू’ म्हणून केला होता.[४] वरील पुरावे, दाखले यांच्या आधारावर विदर्भाचा प्रदेश अस्तित्वात होता हे सिद्ध होते.

**मौर्य काळ** पौराणिक काळानंतर राजकीय इतिहास बघीतला तर सुरूवातीला महान महान सम्राटांची सत्ता होती. विदर्भात मौर्याचे साम्राज्य होते त्यामुळे हा प्रदेश मौर्य सामुदयाचा भाग होता. अशोकाचे दोन शिलालेख चंद्रपूर जिल्ह्यात मिळाले. प्रथम शिलालेख देवटेक येथे मिळाला व दुसरा घुगूस जवळील अभयारण्यात मिळाला.[५] या काळात बौद्ध धर्माचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. दृष्यमित्र शृंग याने मौर्य साम्राज्यात आपली सत्ता स्थापन केली आणि विदर्भ हा शृंग साम्राजाचा भाग बनला. याचा उल्लेख कालिदासाच्या ‘मालाविकाग्निमित्र’ या नाटकात दिसून येतो.[६] मौर्य आणि शृंग राजवटीनंतर विदर्भात सातवाहनाची सत्ता निर्माण झाली.

**सातवाहन राजवट** मौर्याच्यानंतर विदर्भ सातवाहन घराण्याच्या अधिनस्त होता. सातवाहनांची विदर्भात सत्ता होती याचा एक पुरावा म्हणजे कलिंगचा राजा खारवेल यांच्या हाथी गुफा (भुवनेश्वर जिल्हा ओरिसा) या लेखावरून प्राप्त होते.[७] या वंशातील सिमुक सातवाहन या राजाची नाणी तेलंगाना आणि विदर्भ या दोन्ही प्रदेशात मिळाली. वर्धा जिल्ह्यातील पवनार या ठिकाणी मिळालेल्या नाण्यांवरून लक्षात येते की सिमुक या राजाने विदर्भात आपली सत्ता स्थापित केली होती.[८] सातवाहनांच्या नाण्यांचा संच अकोला जिल्ह्यातील तऱ्हाळा येथे १६०० नाण्यापेक्षा जास्त मिळाला. या नाण्यात वसिष्ठपुत्र पुळूमावि पासून तृतीय पुळूमावी पर्यंत पुराणात उल्लेखीत सर्व सातवाहन राजांची पोटिनची नाणी मिळाली आहे.[९] सातवाहनकालीन दोन शिलालेख यवतमाळ जिल्ह्यात वणी तालुक्यातील काथर येथे मिळाली आहेत.[१०]

या आधारावर विदर्भात सातवाहनांची सत्ता होती हे सिद्ध होते. सातवाहन काळात विदर्भाची आर्थिक परिस्थिती सुदृढ होती. शेती, उद्योग, व्यापार या आधारावर येथील जिवनमान चालत होते त्यामुळे विदर्भात आर्थिक सुबत्तता नांदत होती. सातवाहनाच्या घराण्याचा अस्त इ.स. २२० च्या सुमारास झाला. याच काळात शक घराण्याचे काहीकाळ राज्य नागपूर प्रांतात होते.

**वाकाटक राजवट** सातवाहनानंतर विदर्भात काही अल्प कालावधीत क्षत्रप वंशाची सत्ता होती. या संदर्भातील एक लेख ‘एपिग्रापिया इंडिया’ मध्ये प्रसिद्ध झाला. हा शिलालेख असुन क्षत्रप आणि कृषाण दोन्ही वंशाची सत्ता विदर्भात होती हे स्पष्ट होते.[११] क्षत्रपांची नाणी अकोला, उमरावती (अमरावती) यवतमाळ आणि वर्धा येथे सापडली.

विदर्भात मुंड वंशाची सत्ता होती. सातवाहनांच्या अस्तानंतर आणि वाकाटकांच्या उदय यामधील काळात मुंड वंशाची सत्ता असावी असा दावा डॉ. मिराशी करतात.[१२] विदर्भात मुंड वंशाची पाच ताम्रपटे आढळली. ते वेगवेगळया ठिकाणांमध्ये असलेल्या व्यापाऱ्यांकडून प्राप्त करण्यात आली. या आधारावर मुंडांचे सुद्धा विदर्भात राज्य होते हे निदर्शनास येते. वाकाटकांची विदर्भात दिर्घ काळापर्यंत राजवट होती. वाकाटक कालीन विदर्भात आठ ताम्रपट मिळाली. विदर्भात वाकाटकांच्या दोन शाखा होत्या एक नागपूर जिल्ह्यातील नंदिवर्धन (नगरधन–रामटेक) व हीच शाखा काही काळानंतर प्रवरपूर (पवनार–वर्धा) येथे तर दुसरी शाखेची राजधानी वत्सगुल्य म्हणजे वाशिम येथे होती.[१३] या शाखेची स्थापना सर्वसेन या राजाने केली. वाकाटक वंशीय रूद्रसेन राजाचा शिलालेख देवटेक येथे सापडला आहे. रामटेक हे रामगिरी या नावाने वाकाटकांच्या काळात तिर्थक्षेत्र होते. वाकाटक काळातील विटांच्या मंदिराचे पुरावे भंडारा जिल्ह्यात नागरा आणि चंद्रपूर जिल्ह्यात मुलचेरा येथे उत्खननात मिळाले. याच वंशातील प्रवरसेन राजाने कालिदासाच्या साह्याने पाकृत महाकाव्याची रचना केली. वत्सगुल्यम (वाशिम) वाकाटकांच्या काळात साहित्याचे मोठे केंद्र होते. वाकाटक राजवटीचा शेवट इ.स. ५००० च्या सुमारास झाला. वाकाटकांच्यानंतर विदर्भात लहान–लहान घराण्याची सत्ता उदयास आली त्यामध्ये कलचुरी, विष्णुकुण्डी, पांडुवंशी इ. घराणी प्रमुख होती.

**कलचुरी वंशाच्या काळातील विदर्भ**

वाकाटकांच्या अस्तानंतर विदर्भात कलचूरी वंशाची सत्ता स्थापित झाली. कलचूरी घराण्याचा मुळपुरूष कृष्णराय होय. याची नाणी अमरावती जिल्ह्यातील धामोरी येथे मिळाली.[१४] कृष्णराय नंतर त्याचा पुत्र शंकरगण यांच्याकडे विदर्भाची सत्ता आली. कलचुरीचे मांडलीक राष्ट्रकुट होते. कलचुरी वंशाबरोबर राष्ट्रकुट घराण्याची सत्ता विदर्भात होती. या घराण्याचा राजा स्वामीराज याचा एक ताम्रपट नंदीवर्धन येथे मिळाला. याच वंशातील इतर राजांचे ताम्रपट भांदक (भद्रावती) व वर्धा जिल्ह्यातील देवळी येथे मिळाले. या ताम्रपटात नंदीवर्धन व कन्हान नदिचा उल्लेख आढळतो. यावरून कलचूरी घराण्याबरोबर राष्ट्रकुट वंशाची सत्ता विदर्भात होती. राष्ट्रकुटांच्या काळात शेतीमध्ये कापसाचे पिक होऊन त्याची निर्यात विदेशात होत होती.

**कल्याणीचे चालुक्य काळातील विदर्भ**

राष्ट्रकुटांच्या राजवटीनंतर विदर्भ कल्याणीच्या चालूक्याच्या शासनाखाली आला. कल्याणीच्या चालुक्यांचा कार्यकाळ इ.स. ९७३ च्या सुमारास होता. या घराण्यातील सहावा विक्रमादित्य या राजाने विदर्भाचे राज्य आपल्या सत्तेखाली आणले.[१५] सहाव्या विक्रमादित्याचा पाषाण लेख भांदक येथे मिळाला. चालुक्याचा मांडलिक परमारवंश होता. या संदर्भात एक शिलालेख पुसद जवळील डोंगरगाव येथील देवळात आढळला. हा शिलालेख परमारवंशीय जयदेव या राजाचा होता. कल्याणीचे चालुक्य आणि परमारवंशाची सत्ता विदर्भात होती यावरून हे सिद्ध होते.

**देवगीरीचे यादव**

यादव प्रथम राष्ट्रकुटांचे आणि नंतर चालुक्याचे मांडलिक होते. १२व्या शतकात या घराण्यातील पाचव्या भिल्लम याने चालुक्यांवर विजय मिळविला व स्वत:चे राज्य घोषित केले. याने इ.स. ११८७ ला देवगिरी हे ठिकाण राजधानी म्हणून बनविले. भिल्लम चा पुत्र जैत्रापालने यादवांच्या राज्याचा विस्तार केला. याचा पुत्र सिंघणने यादवांच्या राज्याचे साम्राज्यात रूपांतर केले. विदर्भावर यादवांचे राज्य होते याचा पुरावा बुलढाणा जिल्ह्यातील अमदापूर (अम्बडापूर) येथील लेखात 'श्रीमंत प्रताप चक्रवर्ती श्री सिंघणदेव' असा उल्लेख आहे. हा लेख इ.स. १२११—१२१२ या काळातील आहे. अमरावती जिल्ह्यात नांदगाव, गडचिरोली जिल्ह्यात मार्कंडा, रामटेकच्या केवलनृसिंह मंदीरात यादवांचे शिलालेख आढळतात. इ.स. १३ व्या शतकात विदर्भात यादवांची सत्ता होती यावरून स्पष्ट होते.

**मुस्लीम राजवटीतील विदर्भ**

यादवांच्या सत्तेच्या नंतर विदर्भात मुस्लीम घराण्याची सत्ता स्थापित झाली. खिलजी, तुघलक, बहामणी इ. धराण्याची सत्ता विदर्भात होती. निजामशाहीचे सुद्धा विदर्भात राज्य होते. खिलजी घराण्याचा आल्लाउद्दीन खिलजी याचे नाणे विदर्भातील वर्धा जिल्ह्यात मिळाली.[१६] मुस्लीम राजवटीत अचलपूर एक महत्वाचे ठिकाण होते. तुघलक घराण्याचे राज्य सुद्धा विदर्भात होते त्यांनी ही आपल्या कार्यकाळात विदर्भावर राज्य केले. तुघलक घराण्याच्या अस्तानंतर विदर्भात बहामणी घराण्याची सत्ता स्थापन झाली. बहामणी घराण्याचे मुख्य केंद्र अमरावती जिल्ह्यातील गाविलगड येथे होते. १३४७ पासून वऱ्हाडवर बहामणी घराण्याची सत्ता होती. अल्लाउद्दीन बहामनने त्याच्या राज्याचे चार तर्फ केले होते. त्यामध्ये वऱ्हाड चा समावेश होता. बहामणी सत्तेच्या अस्तानंतर वऱ्हाडात इमादशाही घराण्याची सत्ता निर्माण झाली. फतेउल्लाह इमादशाह याने केली. विदर्भ इमादशाही घराण्याच्या ताब्यात जवळपास ८० वर्ष होता. निजामशाहीचे राज्य विदर्भात स्थापन झाले. मुर्तजा निजामशहाने विदर्भात आपले राज्य स्थापन केले. मुगलांचे सुद्धा विदर्भात राज्य होते. या सर्व मुस्लिम घराण्यांनी आपली सत्ता विदर्भात स्थापन केली.

**गोंड राज्यांच्या काळातील विदर्भ**

विदर्भात गोंड राजांचे राज्य होते. देवगडच्या गोंड राज्याच्या राज्यात नागपूरचा समावेश होता. बख्तबुलंदशाहा हा नागपूरवरून राज्यकारभार चालवत होता. नागपूरला गोंड राजांच्या काळात वैभव प्राप्त झाले.चंद्रपूर येथे सुद्धा गोंड राजांची सत्ता होती. भीमबल्लाळसिंग याने चंद्रपूरला आपले राज्य स्थापन केले. चंद्रपूरचा राज्यकारभार शिरपूर (वणी) तालुक्यातून चालत होता. चंद्रपूरच्या गोंड राजांचे राज्य रघुजी भोसल्यांनी आपल्या काळात नागपूरच्या राज्यात समाविष्ट केले. भोसल्यांनी गोंडाचे सर्वच राज्य जिंकुन विदर्भावर आपली सत्ता निर्माण केली. तिसरा रघुजी यांच्या काळात ब्रिटिशांचे नियंत्रण विदर्भावर होते. तिसरा रघुजी भोसले निपुत्रीक असल्याने ब्रिटिशांनी भोसल्यांचे नागपूरचे राज्य मार्च १८५४ मध्ये खालसा करून ब्रिटिश साम्राज्याला जोडले.

विदर्भात वेगवेगळ्या घराण्यांची सत्ता होती त्यांनी आपल्या कार्यकाळात विदर्भाचा आर्थिक व सामाजिक विकास करण्याचा प्रयत्न केला. विदर्भात पानिपत सारख्या मोठया लढाया न झाल्यामुळे या प्रदेशाला शांततेचा वारसा लाभला त्यामुळे या प्रदेशात नेहमीच शांतता नांदत होती. आजही याच आधारावर वेगळया विदर्भाची मागणी होत असतांना शांतीच्याच मार्गाने मोर्चे, आंदोलने होत आहे. त्यामुळेच आज विदर्भाची चळवळ व मागणी इतर राज्याच्या मागणीच्या तुलनेत शांततामय पद्धतीने केली जात आहे.हा प्रदेश आर्थिक सुबत्तता पूर्ण होता त्यामुळे या प्रदेशावर प्रत्येकच घराण्यांची नजर जात होती. त्यामुळे त्यांची या प्रदेशावर राज्य करण्याची इच्छा होती. पूर्वीही विदर्भ प्रदेश आर्थिक बाजूने मजबूत होता आणि आजही आहे. विदर्भाचा इतिहास गौरवपूर्ण राहीला आहे. आणि आपले स्थान इतिहास टिकवून आहे. त्यामुळे स्वतंत्र विदर्भाची फार पूर्वीपासून मागणी होत आहे. विदर्भाचे वेगळे राज्य स्थापन झाल्यास विदर्भाचा आर्थिक विकास होऊन विदर्भ सुदृढ़ विकसित राज्य बनेल.

**संदर्भसूची**

१. वासनिक अनिल, विदर्भ राज्य : एक शोध, नाथे पब्लिकेशन लिमिटेड, नागपूर, २०१६, पृ.क्र. १६
२. डॉ. तिडके श्रीकांत, डॉ. नागरे शिवाजी (संपा), विदर्भ : विविध दिशा आणि दर्शन, अथर्व पब्लिकेशन, धुळे, २०१३, पृ.क्र. २१
३. वासनिक अनिल, पूर्वोक्त, पृ.क्र. १७
४. डॉ. गुप्त चंद्रशेखर, विदर्भ ऐतिहासिक एवं भौगोलिक पृष्ठभुमि, विश्वभारती प्रकाशन, नागपूर, १९९६, पृ.क्र. ८
५. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, नागपूर जिल्हा भाग—१, मुंबई, २००५, पृ.क्र. १११—११२
६. महाराष्ट्र गॅझेटिअर इतिहास, प्राचीन काळ (खंड—१), मुंबई २०१०, पृ.क्र. १३९
७. महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर, नागपूर जिल्हा, भाग—१ मुंबई, २००५, पृ. क्र. ११६
८. कित्ता,
९. कित्ता, पृ.क्र. ११७
१०. कोलाटकर श.गो., पुरंदर गो.मा., विदर्भाचा इतिहास (प्राचिन काळापासून ते एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीस), विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, १९९७, पृ.क्र. १५
११. कोलाटकर रा.गो., पुरंदर गो.मा., पूर्वोक्त, पृ.क्र. १८
१२. कित्ता, पृ.क्र. २१
१३. वासनिक अनिल, पूर्वोक्त, पृ.क्र. २०
१४. गुप्त चंद्रशेखर, पूर्वोक्त, पृ.क्र. ७७
१५. कोंडबत्तुनवार प्रभाकर, आरसा विदर्भाचा, विश्वस्त प्रकाशन, नागपूर, २०१५, पृ.क्र. २८
१६. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, वर्धा जिल्हा, १९९२, पृ.क्र. ४८